VOL- X ISSUE- XI NOVEMBER 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# महाराष्ट्रातील साक्षरता प्रमाणाचा भौगोलिक अभ्यास

प्रा. डॉ. सरवदे एम. पी. ( भूगोल विभाग )
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय लातूर.

## प्रस्तावना

एखाद्या देशाची सामाजिक व आर्थिक प्रगती ही त्या देशातील साक्षरतेच्या प्रमाणावरून ठरत असते. जगात साक्षरता सर्वत्र सारखी नाही. साक्षरता ही संख्यात्मक व गुणात्मक वाढली पाहिजे. साक्षरतेमुळे समाज आधुनिकीकरणाकडे झुकतो. विवाहाचे वय, जन्मदर, मृत्यूदर यावर कोणते घटक परिणाम करतात त्यांच्या वाढीतून निर्माण होणाऱ्या समस्येची जाणीव साक्षरतेमुळे होते. साक्षरतेच्या आधारेच नियोजने व शैक्षणिक धोरणे निश्चित करता येतात. साक्षरतेमुळे गरीबी दूर होते, अंधश्रद्धा नाहिशा होतात, विश्वबंधुत्वाची भावना लोकात वाढण्यास मदत होते. स्त्री साक्षरतेत वाढ झाल्यास अर्भकमृत्यू, बालमृत्यूदर यावर परिणाम होतो. देशात साक्षरतेचे प्रमाण कमी असेल तर लोक आर्थिक दृष्ट्या गरीब होतात. लोक पारंपारिक, भाग्यवादी, निराशावादी विचार करतात. लोकांच्या मानसिकतेत वेगळेपणाची जाणीव निर्माण होते.

लोकांच्या निरक्षरतेमुळे अनेक लोकसंख्या विषयक समस्या उद्भवतात. त्यामुळे साक्षरता प्रमाणास किंवा साक्षरतेनुसार लोकसंख्येच्या विभागणीस लोकसंख्याशास्त्रीय अध्ययनात महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. एखाद्या देशाची लोकसंख्या किती आहे. यापेक्षा देशाच्या विकासाच्या दृष्टीने ती कशी (लोकसंख्येची गुणवत्ता) आहे हे अधिक महत्वाचे ठरते. लोकसंख्येची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षण हा घटक महत्वाचा असतो. त्यामुळे आज शिक्षण हे मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनले आहे. शिक्षण ही सामाजिक व आर्थिक प्रगतीची द्वारे उघडून देणारी सक्षमीकरणाची प्रक्रिया आहे. ज्या प्रक्रियेस १९९० नंतर मानवी विकास निर्देशांक या संकल्पनेच्या माध्यमातून अधिक महत्व प्राप्त झाले आहे. अर्थशास्त्रज्ञ मानवी भांडवल उभारणीमध्ये लोकसंख्येची गुणवत्ता महत्वपूर्ण मानतात आणि ही गुणवत्तता प्रामख्याने शिक्षण, आरोग्य, संस्कृती, तंत्रज्ञान या निकषांच्या आधारे ठरवली जाते. इतर निकषांच्या मुलनेत साक्षरता किंवा शिक्षण हा निकष लोकसंख्येच्या गुणवतेचा प्रमुख निकष ठरतो. शिक्षण या निकषाचा व्यापक दृष्टीने विचार केल्यास इतर सर्व निकष अंतर्भूत असल्याचे दिसतात.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. साक्षरता प्रमाण अभ्यासणे.
२.भारताच्या निवडक राज्यांच्या साक्षरता प्रमाणाचा थोडक्यात आढावा घेणे.
३. महाराष्ट्राच्या साक्षरता प्रमाणाचा अभ्यास करणे.
४.महाराष्ट्राच्या साक्षरता प्रमाणाचा जिल्हा व विभागनिहाय तुलनात्मक अभ्यास करणे.

## संशोधनाच्या परिकल्पना

१. भारताच्या साक्षरतेचा विचार करता केरळ साक्षरतेच्या बाबतीत आजही पहिल्या स्थानावर आहे.
२. महाराष्ट्रातील साक्षरता प्रमाणात वाढ होत आहे.
३. महाराष्ट्रात स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.
४. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे.

## संशोधन पध्दती

संबंधित संशोधनपर लेखासाठी साधारणतः संशोधनाच्या दुय्यम साधनाचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये संशोधनाशी संबंधीत ग्रंथ, पुस्तके, शोध प्रबंध, अहवाल साप्ताहिके, मासिके, त्रैमासिके, पाक्षिके, वर्तमानपत्रे, इ. साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**साक्षरता प्रमाण** —

संयुक्त राष्ट्रसंघाने साक्षरतेच्या केलेल्या व्याख्येनुसार, "साक्षरता म्हणजे समजून उमजून (Understanding वाचण्या निहि सामना हो पात्रता उच्च-जननदर, बाल-मृत्यूदर, माता-मृत्यूदर, १८ वर्षाखालील पूर्णपण विवाहाचे उच्च प्रमाण, ३' स्तरातील जन्माचे उच्च प्रमाण यांसारख्या अनेक लोकसांख्यिकीय समस्या दूर करण्याच्या दृष्टी महत्वपूर्ण मानली जाते. लोकसंख्याशास्त्रीय अभ्यासामध्ये लोकसंख्येच्या साक्षरतेचे मोजमाप करण्यासाठी ढोबळ सात दर (Crude Literacy Rate) हे परिमाण उपयोगात आणले जाते. हा ढोबळ साक्षरता दर पुढील सुत्राच्या साह्याने काढता येतो.

भारतात साक्षरता प्रमाण निश्चित करण्यासाठी या सुत्राचा अवलंब केला जातो. मात्र अलिकडच्या काळात लोकसंख्येचे ढोबळ साक्षरता प्रमाण काढण्यासाठी एकूण लोकसंख्येचा विचार करण्याऐवजी ७० वयाची लोकसंख्या विचारात घेतली जाते.

**भारतातील काही प्रमुख राज्याचे साक्षरता प्रमाण**

भारतातील काही प्रमुख राज्याचे साक्षरता प्रमाण खालील तक्त्यामध्ये दर्शवण्यात आलेले आहे.

**भारतातील काही प्रमुख राज्याचे साक्षरता प्रमाण (प्रमाण % मध्ये)**

| | 2001 | | | 2011 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **राज्य** | **पुरुष** | **स्त्री** | **एकूण** | **पुरुष** | **स्त्री** | **एकूण** |
| **केरळ** | 94.2 | 87.7 | 90.9 | 96.1 | 92.1 | 94.0 |
| **महाराष्ट्र** | 86.0 | 67.0 | 76.9 | 88.4 | 75.9 | 82.2 |
| **गुजरात** | 79.7 | 57.8 | 69.1 | 85.8 | 69.7 | 78.0 |
| **कर्नाटक** | 76.1 | 56.9 | 66.6 | 82.5 | 68.1 | 75.4 |
| **मध्यप्रदेश** | 76.1 | 50.3 | 63.7 | 78.7 | 59.2 | 69.3 |
| **आंध्रा प्रदेश** | 70.3 | 50.4 | 60.5 | 74.9 | 59.2 | 67.0 |
| **राज्यस्थान** | 75.7 | 43.9 | 60.4 | 79.2 | 52.1 | 66.1 |
| **उत्तर प्रदेश** | 68.8 | 42.2 | 56.2 | 77.3 | 57.2 | 67.7 |
| **भारत** | 75.3 | 53.7 | 64.8 | 80.9 | 64.6 | 73.0 |

स्त्रोत :- महाराष्ट्राची आर्थिक पहाणी - २०१८.




देशातील अनेक समस्यांचे मूळ साक्षरता असल्यामुळे निरक्षरता दूर करण्याच्या दृष्टीने सरकारने अनेक उपाय योजना केलेल्या आहेत. तरी देखील २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील साक्षरतेचे प्रमाण ६४.८ टक्के आहे. भारत सरकारने साक्षरता वाढविन्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा परिणाम म्हणून २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील साक्षरतेचे प्रमाण ७३.० टक्यापर्यंत पोहोचले होते. महाराष्ट्राच्या साक्षरतेचा विचार करता २००१ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण ७६.९ टक्के तर २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या साक्षरतेचे प्रमाण ८२.२ टक्क्यापर्यंत वाढल्याचे दिसून येते. साक्षरतेचा विचार करता २००१ व २०११ या दोन्ही जनगणना काळात केरळ हे राज्य अग्रेसर असल्याचे दिसून येते केरळ साक्षरता प्रमाण अनुक्रमे ९०.९ व १४.० असल्याचे दिसून येते त्यानंतर महाराष्ट्राचे साक्षरता प्रमाण इतर राज्यांच्या समाधानकारक असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राचे साक्षरता प्रमाण अनुक्रमे ७६.९ व ८२.२ एवढे आहे. भारतासह राज्याचे सक्षरता प्रमाण समाधानकारक दिसून येत असले तरी देशातील साक्षरतेचे प्रमाण मात्र चिंताजनक आहे. सर्वच राज्यामध्ये पुरुष साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा स्त्री साक्षरतेचे प्रमाण हे उल्लेखनीय दृष्टीने कमी असल्याचे दिसून येते ही बाब चिंतेची आहे शासनाने ७३ व्या घटनादुरुस्ती विधेयकामुळे अलीकडे सर्वांसाठी शिक्षण हा हेतू साध्य होतांना येत आहे. त्यामध्ये स्वि शिक्षणाकडे अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे.

**महाष्ट्रातील साक्षरता प्रमाण**

महाराष्ट्रातील साक्षरता प्रमाणाचा अभ्यास करताना २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय व निहाय साक्षरता प्रमाणाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

VOL- X ISSUE- XI NOVEMBER 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

महाराष्ट्रातील काही जिल्हे प्रगतशीत आहेत असे वाटत जाते. या जिल्ह्यांच्या साक्षरता प्रमाणाचा आढावा घेतांना कुठेतरी या जिल्ह्यांचे साक्षरता प्रमाण कमी असल्याचे दिसते महाराष्ट्रातील विभागनिहाय व जिल्हानिहाय साक्षरता प्रमाण खालील तक्त्यामध्ये दर्शवलेले आहे.

**२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील विभागनिहाय साक्षरता प्रमाण. (प्रमाण %)**

| अ. क्र. | जिल्हा / विभाग | पुरुष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|---|
| 01 | कोकण विभाग | 90.7 | 82.0 | 86.0 |
| 02 | नागपूर विभाग | 90.0 | 78.9 | 84.5 |
| 03 | अमरावती विभाग | 90.8 | 79.0 | 85.0 |
| 04 | पुणे विभाग | 88.9 | 76.2 | 82.7 |
| 05 | नाशिक विभाग | 84.9 | 70.7 | 78.0 |
| 06 | औरंगाबाद विभाग | 84.9 | 67.4 | 76.4 |
| | महाराष्ट्र राज्य | 88.4 | 75.9 | 82.3 |

स्त्रोत :- महाराष्ट्राची आर्थिक पहाणी - २०१८.

तर एकूण २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या साक्षरतेचा विभागनिहाय विचार करता कोकण विभाग हा साक्षरतेच्या ८६.६ टक्के) आहे. हा विभाग पुरुष व स्त्री लोकसंख्येच्या (९०.७ टक्के) बाबतीतही इतर विभांच्या तुलनेने आग्रेसर आहे. या विभागात शहरिकरण व औद्योगिकरण अधिक असल्यामुळे या विभागात साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे कोकण विभागानंतर नागपूर व अमरावती विभाग हा विभाग साक्षरतेच्या बाचतीत अग्रेसर आहे. हा भाग प्रामुख्याने विदर्भाचा आहे. नेहमी असे म्हटले जाते की विदर्भ आणि मराठवाडा हे दोन विभाग मागासलेले आहेत. मात्र विदर्भ हा पुणे (८२.७ टक्के) विभागापेक्षाही अग्रेसर आहे. ज्याला शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखले जाते तो पुणे विभाग महाराष्ट्रात विभागनिहाय विचार करता चौथा क्रमांक लागतो. साक्षरतेच्या बाबतीत औरंगाबाद (७६.४ टक्के) हा विभाग सर्वात शेवटी आहे. म्हणजे महाराष्ट्रात साक्षरेतेच्या बाचतीत मराठवाडा विभाग सर्वात मागे आहे. स्वी साक्षरतेचे प्रमाण तर या विभागात उल्लेखनीय दृष्ट्या कमी आहे. केवळ ६७.४ टक्के स्त्रिया औरंगाबाद विभागात साक्षर आहेत.

**२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय साक्षरता प्रमाण. (प्रमाण %)**

| अ. क्र. | जिल्हा विभाग | पुरुष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|---|
| 01 | मुंबई शहर | 91.2 | 86.5 | 89.2 |
| 02 | मुंबई उपनगर | 92.9 | 86.4 | 89.9 |
| 03 | ठाणे | 88.7 | 79.8 | 84.5 |
| 04 | रायगड | 81.1 | 76.9 | 83.1 |
| 05 | रत्नागिरी | 90.9 | 74.5 | 82.2 |
| 06 | सिंधुदुर्ग | 91.6 | 79.8 | 85.6 |
| | **कोकण विभाग** | **90.7** | **82.0** | **86.6** |
| 07 | नाशिक | 88.2 | 76.1 | 82.3 |
| 08 | धुळे | 79.5 | 65.8 | 72.8 |
| 09 | नंदुरबार | 72.2 | 56.5 | 64.4 |
| 10 | जळगाव | 85.4 | 70.6 | 78.2 |
| 11 | अहमदनगर | 86.8 | 70.9 | 79.1 |
| | **नाशिक विभाग** | **84.9** | **70.7** | **78.0** |
| 12 | पुणे | 90.8 | 81.1 | 86.2 |
| 13 | सातारा | 89.4 | 76.3 | 82.9 |
| 14 | सांगली | 88.2 | 74.6 | 81.5 |
| 16 | सोलापुर | 85.0 | 68.5 | 87.0 |
| 16 | कोल्हापुर | 88.6 | 74.2 | 81.5 |
| | **पुणे विभाग** | **88.9** | **76.2** | **82.7** |
| 17 | औरंगाबाद | 87.4 | 70.1 | 79.0 |
| 18 | जालना | 81.5 | 61.0 | 71.5 |
| 19 | परभणी | 82.6 | 63.6 | 73.3 |
| 20 | हिंगोली | 86.9 | 69.0 | 78.2 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 21 | बीड | 85.6 | 67.8 | 77.0 |
| 22 | नांदेड | 84.6 | 66.1 | 75.5 |
| 23 | उस्मानाबाद | 85.8 | 70.5 | 78.4 |
| 24 | लातूर | 84.4 | 69.6 | 77.3 |
| | **औरंगाबाद विभाग** | 84.9 | 67.4 | 76.4 |
| 25 | बुलढाणा | 90.5 | 75.8 | 83.4 |
| 26 | अकोला | 92.3 | 83.5 | 88.0 |
| 27 | वाशीम | 90.5 | 75.5 | 83.2 |
| 28 | अमरावती | 91.5 | 83.1 | 87.4 |
| 29 | यवतमाळ | 89.4 | 75.9 | 82.8 |
| | **अमरावती विभाग** | 90.8 | 79.0 | 85.0 |
| 30 | वर्धा | 91.9 | 81.8 | 87.0 |
| 31 | नागपूर | 92.1 | 84.0 | 88.4 |
| 32 | भंडारा | 90.4 | 77.1 | 83.8 |
| 33 | गोंदिया | 92.0 | 77.9 | 85.0 |
| 34 | चंद्रपूर | 86.8 | 73.0 | 80.0 |
| 35 | गडचिरोली | 82.3 | 66.3 | 74.4 |
| | **नागपूर विभाग** | 90.0 | 78.9 | 84.5 |
| | **महाराष्ट्र राज्य** | 88.4 | 75.9 | 82.3 |

स्त्रोत - महाराष्ट्राची आर्थिक पहाणी - २०१८.

महाराष्ट्राच्या साक्षरता प्रमाणाचा जिल्हानिहाय अभ्यास करता असे दिसून येते की, पुरुष साक्षरतेच्या बाबतीत मुंबई उपनगर (९२.९ टक्के) महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर आहे. या जिल्ह्यात शहरीकरणाचे प्रमाण अधिक असल्यामुळे पुरुष साक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. तर स्त्री साक्षरतेच्या बाबतीत मुंबई शहर (८६.५ टक्के) हा जिल्हा पहिल्या क्रमांकावर आहे. या दोन्ही जिल्ह्यात शहरीकरण आधिक आहे असे असले तरी पुरुष व स्त्री साक्षरता समान नाही म्हणजेच केवळ ग्रामीण भागातच स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी आहे असे म्हणता येत नाही. तर शहरी भागात देखील ही विषमता दिसून येते. नंदुरबार या जिल्ह्यात पुरुष (७२.२ टक्के) व स्त्री (५६.५ टक्के) साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी आहे. हा जिल्हा मागासलेला असल्यामुळे व प्रामुख्याने आदिवासी लोकांचे प्रमाण अधिक असल्यामुळे या जिल्ह्यात सर्वात कमी साक्षरता आहे. महाराष्ट्रातील एकूण साक्षरतेचा विचार करता, मुंबई उपनगरामध्ये (८९.९ टक्के) साक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक आहे. नंदुरचार जिल्ह्यात (६४.४ टक्के) साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी आहे, नंदुरबार जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण खुपच कमी आहे. साक्षरतेमध्ये सुधारना झाल्याशिवाय लोकांना आर्थिक विकासाचे महत्व कळणार नाही. त्या जिल्ह्याचा आर्थिक विकास करावयाचा झाल्यास साक्षतेचे प्रमाण वाढवणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्राच्या साक्षरतेचा विचार करता २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात एकूण पुरुष लोकसंख्येपैकी केवळ ८८.४ टक्के लोकसंख्या ही साक्षर आहे, तर एकूण स्त्री लोकसंख्येपैकी केवळ ७५.९ टक्के लोकसंख्या आहे. म्हणजेच स्त्रीयांच्या साक्षरतेत सुधारना करणे आवश्यक आहे. कुटुंबात स्त्री साक्षरता महत्वाची असते , ती शिकली तर घरामध्ये सुधारणा होते. महाराष्ट्रातील एकूण साक्षर लोकसंख्येचा विचार करता ८३.३ टक्के लोकासंख्या साक्षर आहे.

भारतातील इतर राज्यांच्या तुलनेने हे प्रमाण समाधानकारक असले तरी महाराष्ट्राच्या साक्षरता प्रमाणात सुधारना आवश्यक आहे.

## निष्कर्ष

१. भातरतातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील साक्षरता प्रमाण हे समाधानकारक आहे. मात्र या साक्षरता प्रमाणात सुधारना होणे आवश्यक आहे.

२. २००१ च्या जनगणनेच्या तुलनेत २०११ च्या जनगणनेमध्ये महाराष्ट्रातील साक्षरता प्रमाणात सुधारना झाल्याचे दिसून येते.

३. महाराष्ट्राच्या जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये पुरुष साक्षरतेच्या तुलनेत स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याचे पहावयास मिळते.

४. महाराष्ट्राच्या विभागनिहाय साक्षरता प्रमानाचा विचार करता कोकन विभाग हा स्त्री साक्षरता, पुरुष साक्षरता व एकूण साक्षरतेच्या बाबतीत अग्रेसर आहे.

५. महाराष्ट्राच्या विभागनिहाय साक्षरता प्रमानाचा विचार करता औरंगाबाद विभाग हा स्त्री साक्षरता, पुरुष साक्षरता व एकूण साक्षरतेच्या बाबतीत इतर विभांच्या तुलनेने सर्वात मागे आहे.

६. महाराष्ट्राच्या जिल्हानिहाय साक्षरता प्रमाणाचा अभ्यास करता असे दिसून येते की, मुंबई शहर व मुंबई उपनगर हे स्त्री साक्षरता, पुरुष साक्षरता व एकूण साक्षरता प्रमाणात अग्रेसर आहे.

७.महाराष्ट्राच्या जिल्हानिहाय साक्षरता प्रमाणाचा अभ्यास करता असे दिसून येते की, नंदुरबार हा जिल्हा स्त्री साक्षरता, पुरुष साक्षरता व एकूण साक्षरता प्रमाणात इतर जिल्ह्यांच्या तुलनेने खुपच मागे आहे.

**संदर्भ सूची**

१. प्रा. आशा भेंडे - प्रिंसीपल्स ऑफ पॉपुलेशन स्टडीज हिमालया पब्लीशींग हाऊस, बॉम्बे,

२. ए.बी. सवदी. - द मेगा स्टेट महाराष्ट्र निराला प्रकाशन पुणे,

३. भुजंगराव कुलकर्णी - मराठवाड्याचा विकास अभ्यास व चिंतन- पद्मा प्रकाशन औरंगाबाद.

४. पी. बी. देसाई - अ सर्वे ऑफ रिसर्च इन डेमोग्राफी - इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, पॉप्युलर प्रकाशन, बॉम्बे.

५. आर. एन. माथूर पॉप्युलेशन : ॲनालिसिस ॲंड स्टडीज - पब्लिकेशन्स् अलाहाबाद, इंडिया.

६. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी २०१८.

७. लोकसंख्या भूगोल - शेते, फुले, शहापूरकर.